# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

उप-प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद

**विषय:-** मा. हरित लवादाने दिलेल्या निर्देशानुसार प्रदूषीत नदीपट्टयातील प्रदूषण रोखण्याकरिता स्वतंत्र पर्यावरण सनियंत्रण दलाची (**Special Environment Surveillance Task Fource**) ची स्थापना करणे बाबत.

**संदर्भ:-** राज्यातील नद्यांच्या प्रदूषित पट्टयांबाबत कृति आराखडा राबविण्याबाबत नदी पुनरुत्थान समितीची स्थापना करण्याबाबत महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक NGT-2018/प्र.क्र.२/तां.क.३ दि. १३/१२/२०१८.

| दिनांक | कोणाकडे पाठविले | टीप व सुचना |
|---|---|---|
| २४/०६/१९ | प्रा. अ. औरंगाबाद | |
| २४/०६/१९ | जिल्हाधिकारी औरंगाबाद | |

# कार्यालयीन टिप्पणी

**विषयः**- मा. हरित लवाद यांनी दिलेल्या निर्देशानुसार प्रदूषीत नदीपट्टयातील प्रदूषण रोखण्याकरिता स्वतंत्र पर्यावरण सनियंत्रण दलाची (**Special Environment Surveillance Task Fource**) ची स्थापना करणे बाबत.

**संदर्भः**- राज्यातील नद्यांच्या प्रदूषित पट्ट्यांबाबत कृति आराखडा राबविण्याबाबत नदी पुनरुत्थान समितीची स्थापना करण्याबाबत महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक NGT-2018/प्र.क्र.२/तां.क.३ दि. १३/१२/२०१८.

देशातील नद्यांच्या प्रदूषित पट्टयांबाबत दिनांक. १७/०१/२०१८ रोजी दैनिक "द हिंदू" मध्ये प्रसिध्द वृत्ताच्या अनुषंगाने मा. राष्ट्रीय हरित लवाद दिल्ली यांनी मूळ अर्ज क्र. ६७३/२०१८ दाखल करुन घेण्यात आला होता. मा. लवादाने सदर प्रकरणी दिनांक. २९/०९/२०१८ रोजी आदेश पारित करताना संपूर्ण देशामध्ये ३५१ प्रदूषित पट्टे असून सदर प्रदूषित पट्टयांचे वर्गीकरण प्राथम्य क्र. **I** ते **V** प्रकारामध्ये केले आहे. त्यामध्ये राज्यातील एकूण ५३ प्रदूषित पट्टयांचा समावेश करण्यात आला असून सदर ५३ प्रदूषित पट्टयांमधील ९ प्रदूषित पट्टे प्रथम्य क्र. **I**, ६ प्रदूषित पट्टे प्राथम्य क्र. **II**, १४ प्रदूषित पट्टे प्राथम्य क्रमांक **III**, १० प्रदूषित पट्टे प्राथम्य क्र. **IV** व १४ प्रदूषित पट्टे प्राथम्य क्र. **V** मध्ये समाविष्ट आहेत. मा. हरित लवाद, दिल्ली यांनी दिलेल्या निर्देशांनुसार राज्यातील ५३ प्रदूषित नद्यांच्या पट्टयांमधील प्रदूषण कमी करण्याकरिता कृति आराखडा तयार करणे, त्याची अंमलबजावणी करण्याकरिता नदी पुनरुत्थान समिती, पर्यावरण सनियंत्रण कार्यदल नियुक्त करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्या अनुषंगाने शासन खालील प्रमाणे आदेशित केले आहे.

मा. न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार प्रदूषीत नदीपट्टयातील प्रदूषण रोखण्याकरिता स्वतंत्र पर्यावरण सनियंत्रण दलाची (**Special Environment Surveillance Task Fource**) ची स्थापना प्रदूषण पट्टे असलेल्या जिल्हयाची करावयाची असल्याचे आदेश देण्यात आले आहे. विशेष कृती दलाची समिती खालीलप्रमाणे गठीत करण्यात यावी.

| अ.क्र. | कृती दलाचे सदस्य | प्रतिनीधीचे नाव व पदनाम |
|---|---|---|
| १ | जिल्हा दंडाधिकारी यांचे प्रतिनिधी | |
| २ | जिल्हा पोलीस अधिक्षक यांचे प्रतिनिधी | |
| ३ | प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ किंवा त्यांचे प्रतिनिधी | |
| ४ | विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष या नात्याने जिल्हा न्यायाधीश यांनी नियुक्त केलेला प्रतिनिधी | |

सबब शासन निर्णयात नमुद केल्याप्रमाणे जिल्हास्तरिय विशेष कृती दल गठीत करण्याकिरता प्राथमिक बैठक घेण्या करिता तारीख व वेळ देण्यात यावा हि नम्र विनंती.

उप-प्रादेशिक अधिकारी, औरंगाबाद

प्रादेशिक अधिकारी, औरंगाबाद - बैठकीची तारीख व आपले प्रतिनिधीचे नाव सुचवावे ही विनंती. 24-06-19

मा. जिल्हाधिकारी, औरंगाबाद - District mining officer

Register Sr. No. 579 Date. 24/06/2019

मा. जिल्हा न्यायाधीश, औरंगाबाद यांचे विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष या नात्याने प्रतिनीधी-
सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण औरंगाबाद.

(सोबत पत्र)

मा. जिल्हा न्यायाधीश, औरंगाबाद

जिल्हा पोलीस अधिक्षक यांचे प्रतिनीधी - PI मुंढे, स्था.गु.शा.

मा. जिल्हा पोलीस अधिक्षक, औरंगाबाद

दि. 29/6/2019

जिल्हा खनिकर्म अधिकारी :
सदर समिती बैठक आयोजित करणेकरीता तारीख व वेळ देण्यात यावी. ही विनंती.

नायब तहसीलदार
कामान्वयक

जिल्हा खनिकर्म अधिकारी :

जा.क्र. / प्रशा / ५९०३ / 2019
जिल्हा व सत्र न्यायालय,
औरंगाबाद,
दिनांक : २५.06.2019

प्रति,

उप– प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट प्रदूषण नियंत्रण मंडळ,
उप प्रादेशिक कार्यालय **औरंगाबाद.**

विषय : स्वतंत्र पर्यावरण संनियंत्रण दल Special Environment Surveillance Task Force) प्रतिनिधी नियुक्त करणे बाबत.

संदर्भ : . 1. महाराष्ट शासन निर्णय क्रमांक मा. उच्च न्यायालयाचे पत्र जा. NGT-2018/ प्रक.2 / तां.क. 3 दिनाक 13 / 12 / 2018.
2. आपले कार्यालयीन पत्र जा. क. मप्रनिमं / उप्राकाऔ / 846 / 2019 दिनांक 18 / 06 / 2019

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, पर्यावरण विभाग, महाराष्ट शासन यांच्या उपरोक्त संदर्भिय शासननिर्णयानुसार स्थापन होणा–या स्वतंत्र पर्यावरण संनियंत्रण दल ( Special Environment Surveillance Task Force) या मध्ये प्रतिनिधी म्हणून सदस्य सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण औरंगाबाद यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

आपला विश्वासू,

( संजय ग. मेहरे ),
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
औरंगाबाद.

प्रत माहितीस्तव व कार्यवाहीस्तव
सदस्य सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
औरंगाबाद.

Letter2.doc

राज्यातील नद्यांच्या प्रदूषित पट्टयांबाबत कृति आराखडा राबविण्याबाबत नदी पुनरुत्थान समितीची स्थापना करण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**
**पर्यावरण विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः NGT -२०१८/प्र.क्र.२/तां.क.३**
**१५ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन**
**मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**
**तारीख: १३/१२/२०१८**

वाचा -

१) मा. राष्ट्रीय हरित लवाद, नवी दिल्ली यांचे मूळ अर्ज क्र.६७३/२०१८ प्रकरणी दिनांक २०.०९.२०१८ रोजीचे आदेश

प्रस्तावना -

देशातील नद्यांच्या प्रदूषित पट्टयांबाबत दिनांक १७.९.२०१८ रोजी दैनिक "द हिंदू"" मध्ये प्रसिध्द वृत्ताच्या अनुषंगाने मा. राष्ट्रीय हरित लवाद दिल्ली यांनी मूळ अर्ज क्र.६७३/२०१८ दाखल करुन घेण्यात आला होता. मा. लवादाने सदर प्रकरणी दिनांक २०.९.२०१८ रोजी आदेश पारित करताना संपूर्ण देशामध्ये ३५१ प्रदूषित पट्टे असून सदर प्रदूषित पट्टयांचे वर्गीकरण प्राथम्य क्र.I ते V प्रकारामध्ये केले आहे. त्यामध्ये राज्यातील एकूण ५३ प्रदूषित पट्टयांचा समावेश करण्यात आला असून सदर ५३ प्रदूषित पट्टयांमधील ९ प्रदूषित पट्टे प्राथम्य क्र.I, ६ प्रदूषित पट्टे प्राथम्य क्र.II, १४ प्रदूषित पट्टे प्राथम्य क्रमाक III, १० प्रदूषित पट्टे प्राथम्य क्र.IV व १४ प्रदूषित पट्टे प्राथम्य क्र. V मध्ये समाविष्ट आहेत. मा. हरित लवाद, दिल्ली यांनी दिलेल्या निर्देशांनुसार राज्यातील ५३ प्रदूषित नद्यांच्या पट्टयांमधील प्रदूषण कमी करण्याकरिता कृति आराखडा तयार करणे, त्याची अंमलबजावणी करण्याकरिता नदी पुनरुत्थान समिती, पर्यावरण सनियंत्रण कार्यदल नियुक्त करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय -

१) मा. हरित लवादाने राज्यातील ५३ प्रदूषित नद्याच्या पट्टयामधील प्रदूषण कमी करण्याकरिता कृति आराखडा तयार करणे, सदर आराखडयाची अंमलबजावणी करुन त्यावर सनियंत्रण करणे, याकरिता प्रधान सचिव (पर्यावरण) यांच्या मार्गदर्शनाखाली पुढीलप्रमाणे पाच सदस्यीय " नदी पुनरुत्थान समिती गठीत करण्यात येत आहे. सदर कृती आराखडयाच्या अंमलबजावणीसाठी सदर समिती ही नियंत्रण समिती असेल.

| अ.क्र. | समितीचे सदस्य |
|---|---|
| १) | आयुक्त तथा संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय |
| २) | मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ |
| ३) | संचालक (पर्यावरण) |
| ४) | संचालक (उद्योग) |
| ५) | सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ - सदस्य व समन्वयक |

उपरोक्त समितीच्या सदस्यांमध्ये समन्वय साधणे, बैठकांचे आयोजन करणे, कृति आराखडा तयार करुन त्याची अंमलबजावणी करणे इ. बाबत कार्यवाही करण्याची जबाबदारी सह संचालक ( जलप्रदूषण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांची राहील.

२) समितीने प्रदूषित नद्यांच्या पट्ट्यातील प्रदूषण कमी करण्याकरिता कृती आराखडा (प्राथम्यक्रम I व II मधील प्रदूषित नद्यांचे पट्टयांबाबत) प्राधान्याने दोन महिन्याच्या आत तयार करुन सदर आराखडा केंद्रिय प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे सादर करावा.

३) कृति आराखडा तयार करताना प्रदूषणाचे घटक निश्चित करणे यामध्ये STP/ETP ची सद्यस्थिती /Functioning घनकचरा व्यवस्थापन निर्माण होणा-या कच-याची Quantity, त्यावरील प्रक्रिया, घनकच-याची गुणवत्ता, प्रदूषित पट्टयांमध्ये Catchment मध्ये निर्माण होणारे सांडपाणी या सर्व बाबींचा समावेश करण्यात यावा, तसेच भूजल उत्खनन, चांगल्या पाणी धारणा पध्दतीचा वापर, पावसाचे पाण्याचे संवर्धन, पाण्याच पुर्नःभरण, नदीचा किमान प्रवाह राखणे, नदीच्या दोन्ही बाजूंना झाडांची लागवड करणे व इतर बाबींचा समावेश करण्यात यावा. सदर आराखडयामध्ये प्रामुख्याने सांडपाणी वाहून नेणारी गटारे योग्य दिशेने वळविणे, तसेच प्रक्रियायुक्त सांडपाण्याचा जास्तीत जास्त वापर करणे, जेणेकरुन जमिवरील/खालील पाण्याचा कमीत कमी वापर होईल याकडे लक्ष देण्यात यावे, सदर कृती आराखडा हा Specific, definite or specific timeless for execution steps. सदर कृति आराखडयाच्या अंमलबजावणीकरिता यंत्रणेचा वापर करणे, राज्याच्या/ केंद्र शासनाच्या योजनेमधील स्थानिक प्राधिकरणाच्या महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निधीचा वापर करण्याचा अधिकार नदी पुनरुत्थान समितीस राहील.याकरिता तरतूद करण्यात यावी

४) सदर कृति आराखडयाची छाननी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून करण्यात येईल.

५) मा. न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार प्रदूषित नदी पट्टयांमधील प्रदूषण रोखण्याकरिता पुढीलप्रमाणे स्वतंत्र पर्यावरण सनियंत्रण दलाची ( Special Environment Surveillance Task Force ) ची स्थापना प्रदूषित पट्टे असलेल्या जिल्हयामध्ये करण्यात यावी

| अ.क्र. | कृती दलाचे सदस्य |
|---|---|
| १ | जिल्हा दंडाधिकारी यांचे प्रतिनिधी |
| २ | जिल्हा पोलीस अधिक्षक यांचे प्रतिनिधी |
| ३ | प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ किंवा त्यांचे प्रतिनिधी |
| ४ | विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष या नात्याने जिल्हा न्यायाधीश यांनी नियुक्त केलेला प्रतिनिधी |

. नदीच्या प्रदूषित पट्टयामध्ये वाळू उत्खनन होणार नाही याची खबरदारी सदर सनियंत्रण दलाने घ्यावयाची आहे. उपरोक्त समितीच्या सदस्यांमध्ये समन्वये साधणे, बैठकांचे आयोजन करणे व निर्णयांची

अंमलबजावणी करणे इत्यादी बाबत कार्यवाही करण्याची जबाबदारी संबंधित विभागीय अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांची राहील.

६) सदर नदी पुनरुत्थापन समितीने स्वतःचे संकेतस्थळ (वेबसाईट) सुरु करुन त्यामध्ये जास्तीत जास्त शैक्षणिक संस्था, धार्मिक संस्था तसेच आर्थिक आस्थापनेमधील व्यक्तींना सहभागी करुन घेण्याबाबत प्रयत्न करावा. समितीमार्फत करण्यात येणा-या कार्यवाहीची माहिती संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी. समितीचा एखादा प्रकल्प यशस्वी करण्याकरिता सहाय्य करणा-यांना प्रोत्साहनपर बक्षिस देण्याबाबतही समितीमार्फत विचार व्हावा.

७) मा. लवादाने O.A. No २०० of २०१४ (M.C. Mehta Vs UOI) मध्ये दिनांक १३.७.२०१७ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार प्रदूषण करणा-यांकडून Polluter pays principle नुसार दंड वसूली करण्याचा अधिकार सदर नदी पुनरुत्थान समितीला राहील. सदर नदी पुनरुत्थान कामासाठी स्वेच्छेने देणग्या देण्यासाठी इच्छूक, उद्योगांचे सामाजिक दायित्वांतर्गत सहभाग, स्वयंसेवी संस्था आणि खाजगी सहभाग इ. ची मदत घेण्याबाबतचा निर्णय समितीने घ्यावयाचा आहे.

२. सदर समित्यांचा दैनंदिन खर्च तसेच कृति आराखडा बनवून त्यांची अंमलबजावणी करण्याचा खर्च हा पाणी प्रदूषण अधिनियम १९७४ मधील तरतुदीनुसार राज्य प्रदूषण मंडळाकडे कन्सेंस्टच्या माध्यमातून जमा होणा-या निधी मधून भागविण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक 201812131601110004 असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(संजय संदानशिव
शास्त्रज्ञ श्रेणी-२ तथा अवर सचिव (पर्यावरण)

प्रति,

१) मा.राज्यपालांचे सचिव.
२) मा. मुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव
३) उप मुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव
४) सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५) शासनाचे मुख्य सचिव/ सर्व अप्पर मुख्य सचिव/ पधान सचिव/सचिव
६) सर्व विभागीय आयुक्त,
७) सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सायन
८) संचालक (पर्यावरण)
९) संचालक (नगर विकास)
१०) संचालक (उद्योग)
११) सर्व जिल्हाधिकारी

१२) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१३) सर्व महानगरपालिका/नगरपरिषदा/ ग्रामपंचायत/ मुख्याधिकारी
१४) सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालयीन विभागाध्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख
१५) संचालक ( नगर विकास विभाग )
१६) निवडनस्ती.